राष्ट्रोध्दारार्थ तंत्र शिक्षणम्

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/मराठी टंकलेखन/२०२३/ ७६८ दिनांक : 15 FEB 2023

**परिपत्रक**

प्रति,

उपसचिव / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय संस्था / कार्यालये.

**विषय : लिपीक-टंकलेखक या पदासाठी मराठी / इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणेबाबत..**

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक टंलेप्र-१०८१/प्र.क्र.३४४/वीस-ब, दिनांक ०६/०५/१९९१.

(२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक आरटीआर-२०१४/प्र.क्र.३५५/१२, दिनांक ०६/०६/२०१७.

(३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०२३/प्र.क्र.१/ कार्यासन १२, दिनांक १२/०१/२०२३.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने राज्य शासकीय कार्यालयातील लिपीक-टंकलेखक या पदाचे सेवाप्रवेश नियम संदर्भ क्रमांक (२) अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर सेवा प्रवेश नियमात लिपीक टंकलेखक पदासाठी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे प्रमाणपत्र धारण करणे ही तांत्रिक अर्हता नमूद करण्यात आलेली आहे

महाराष्ट्र शासनाचे कामकाज प्रामुख्याने मराठी भाषेतून होत असल्याने लिपीक-टंकलेखक या पदावर इंग्रजी टंकलेखन करणा-या उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्याला संदर्भ क्रमांक (१) च्या अधिसूचने अन्वये मराठी टंकलेखन सक्तीचे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनात सर्व कामकाज मराठी भाषेतून करण्यात येते, यास्तव संदर्भ क्रमांक (१) च्या अधिसूचनेनुसार **केवळ इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र** धारण करणा-या उमेदवाराची लिपीक टंकलेखक पदावर नियुक्ती झाल्यानंतर, त्याने **नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट** वेगमर्यादेचे प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे आहे, अन्यथा त्याची **वार्षिक वेतन वाढ रोखण्याची तरतूद** सदर अधिसूचनेत केली आहे.

तसेच या नियमावलीच्या अधीनतेने इंग्रजी लघुलेखनाचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे काम करणा-या प्रत्येक लघुलेखकाला किंवा प्रत्येक लघुटंकलेखकाला **विहीत कालावधीत मराठी** लघुलेखनाची किंवा मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल असेही नमूद केले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी संदर्भित अधिसूचनेतील तरतूदींनुसार आपल्या संस्थेतील / कार्यालयातील लघुलेखक, लघुटंकलेखक व लिपीक-टंकलेखक या पदावर कार्यरत ज्या कर्मचा-यांकडे मराठी लघुलेखनाचे किंवा मराठी टंकलेखनाचे प्रमाणपत्र आहे किंवा नाही ? याबाबत **संस्था स्तरावर शहानिशा करणे. तसेच ज्या कर्मचा-यांकडे तसे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल त्यांना एक वर्षाच्या कालावधीत संबंधित प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेबाबत कळविणे, विहीत कालावधीत प्रमाणपत्र धारण न केल्यास त्यांची वेतन वाढ रोखली** जाईल असेही संबंधितांना संस्था स्तरावर कळवून, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करणे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : वरील प्रमाणे

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक सहपत्रांसह या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

E:\my documents\Typing Certificate.docx\2

लिपिक-टंकलेखक या पदासाठी मराठी /इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणेबाबत......

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही २०२३/प्र.क्र.१/कार्यासन १२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १२ जानेवारी, २०२३

**वाचा :-**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. आरटीआर २०१४/प्र.क्र.३५५/१२, दि.०६.०६.२०१७
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. टंलेप्र -१०८१/प्र.क्र.३४४/वीस-ब, दि.०६.०५.१९९१

**प्रस्तावना :-**

राज्य शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक या पदाचे सेवाप्रवेश नियम संदर्भाधिन क्र.१ च्या अधिसूचने अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमात लिपिक-टंकलेखक पदासाठी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे प्रमाणपत्र धारण करणे ही तांत्रिक अर्हता नमूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार पदभरती करीत असताना गुणवत्तेनुसार मराठी किंवा इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणा-या उमेदवाराची शासनाच्या लिपिक-टंकलेखक पदावर निवड होते.

महाराष्ट्र शासनाचे कामकाज प्रामुख्याने मराठी भाषेतून होत असल्याने, लिपिक-टंकलेखक या पदावर इंग्रजी टंकलेखन करणाऱ्या उमेदवाराची नियुक्ती झाल्यास, त्याला संदर्भाधिन क्र.२ च्या अधिसूचने अन्वये मराठी टंकलेखन सक्तीचे करण्यात आले आहे. जरी महाराष्ट्र शासनाचे कामकाज प्रामुख्याने मराठी भाषेतून होत असले तरी, काही कार्यालयांमध्ये बहुतांशी कामकाज इंग्रजी भाषेतून पार पाडावे लागते. अशा कार्यालयांत लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवाराकडे केवळ मराठी टंकलेखन प्रमाणपत्र असल्यास, इंग्रजी टंकलेखनाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होतो. सबब, अशा कार्यालयांच्या आवश्यकतेनुसार इंग्रजी टंकलेखन देखील गरजेचे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

लिपिक-टंकलेखक या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सदर पदावर नियुक्तीसाठी मराठी किंवा इंग्रजी टंकलेखन यापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येत असले तरी, प्रस्तावनेत नमूद पार्श्वभूमीवर लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्तीनंतर प्रत्यक्ष शासकीय कामकाज पार पाडण्याच्या दृष्टीने, या शासन निर्णयाद्वारे पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र शासनात सर्व कामकाज मराठी भाषेतून करण्यात येते. यास्तव, संदर्भाधिन क्रमांक २ च्या अधिसूचनेनुसार केवळ इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणा-या उमेदवाराची लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती झाल्यानंतर, त्याने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षांत मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे आहे. अन्यथा, त्याची वार्षिक वेतनवाढ रोखण्याची तरतूद सदर अधिसूचनेत केली आहे.

२) शासकीय कामकाज मराठी भाषेतून होत असले तरीही काही विशिष्ट कार्यालयांमधील बहुतांश कामकाज इंग्रजी भाषेतून पार पाडावे लागते. (उदा. न्यायालय व न्यायाधिकरणातील सरकारी वकिलांची कार्यालये) यास्तव, केवळ मराठी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणा-या उमेदवाराची अशा शासकीय कार्यालयात लिपिक-टंकलेखक या पदावर निवड झाल्यास, त्या उमेदवाराने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षांत इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे राहील. अन्यथा, त्याची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येईल.

नियुक्ती प्राधिकारी यांनी लिपिक-टंकलेखक पदावर निवड झालेल्या उमेदवाराकडे मराठी/इंग्रजी यापैकी कोणते टंकलेखन प्रमाणपत्र आहे ही बाब तपासून, नियुक्ती आदेशात वरील १ किंवा २ यापैकी आवश्यकतेनुसार योग्य ती तरतूद नमूद करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०११२१११४०१९४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GEETA RAHUL KULKARNI

Digitally signed by GEETA RAHUL KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=92D474843B842720200D1A10946D5FC9348B9450F867605A47D177207C9BD384, cn=GEETA RAHUL KULKARNI
Date: 2023.01.12 11:17:17 +05'30'

**( गीता रा. कुलकर्णी )**

उप सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),(सदर शासन निर्णय आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व राज्य शासकीय कार्यालयाच्या निदर्शनास आणावा)
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१४. मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोंकण भवन, नवी मुंबई,
१५. सर्व विभागीय आयुक्त (सदर शासन निर्णय आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व राज्य शासकीय कार्यालयाच्या निदर्शनास आणावा)
१६. निवडनस्ती.

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मे १९९१

भारताचे संविधान

क्रमांक टंलेप्र. १०८१/सीआर-३४४/वीस-ब.---भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून आणि या बाबतीत काढण्यात आलेले व राज्य मध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये अंमलात असलेले सध्याचे सर्व नियम व आदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांनी प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन अर्हतेबाबत पुढील नियमावली तयार करीत आहेत, ती अशी :---

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.---(१) या नियमास "महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली १९९१" असे संबोधण्यात येईल.

(२) ही नियमावली अधिसूचना प्रसिद्ध होईल त्या दिनांकापासून अंमलात येईल.

(३) ही संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू राहील :

२. व्याख्या.---या नियमावलीत, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर---(अ) एतदर्थ मंडळ" म्हणजे शासनाच्या सेवेतील इंग्रजी लघुलेखकांच्या व इंग्रजी टंकलेखकांच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन परीक्षा घेण्यासाठी शासनाने नेमलेले मंडळ होय.

(ब) "परिशिष्ट" म्हणजे या नियमावलीस जोडलेले परिशिष्ट होय,

(क) "प्रारंभ दिनांक" म्हणजे हे नियम अंमलात येतील तो दिनांक होय.

(ड) "वाणिज्य संस्था" म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने मराठी लघुलेखन प्रशिक्षणासाठी व मराठी टंकलेखन प्रशिक्षणासाठी मान्यता दिलेली वाणिज्य संस्था होय.

(ई) "इंग्रजी लघुलेखक" म्हणजे शासनाच्या सेवेत लघुलेखकाच्या पदावर नेमलेली व्यक्ती होय आणि या मध्ये निवडश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक किंवा लघु टंकलेखक या पदांवर नेमलेल्या व इंग्रजी लघुलेखनाचे काम करणाऱ्या व्यक्तींचाही समावेश आहे.

(फ) "इंग्रजी टंकलेखक" म्हणजे शासनाच्या सेवेत टंकलेखकाच्या पदावर नेमलेली व्यक्ती होय आणि या मध्ये लिपिक टंकलेखकाच्या पदांवर नेमलेल्या व इंग्रजी टंकलेखनाचे काम करणाऱ्या व्यक्तींचाही समावेश आहे.

(ग) "परीक्षा" म्हणजे, या नियमानुसार एतदर्थ मंडळाने घेतलेली मराठी लघुलेखनाची व मराठी टंकलेखनाची परीक्षा होय.

(ह) "विद्यमान प्रशिक्षण योजना" म्हणजे ही नियमावली अंमलात येण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक टंलेप्र-१०७७-सी-२६४२-२०, दिनांक १६ जून १९८१ अन्वये अंमलात असलेली मराठी टंकलेखन व लघुलेखन प्रशिक्षणाची योजना होय.

(आय) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन होय.

(जे) "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये विभागीय मंडळाने घेतलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा होय आणि त्यामध्ये शासनाने तत्सम म्हणून घोषित केलेल्या इतर कोणत्याही परीक्षेचा समावेश होतो.

३. **लघुलेखक व टंकलेखक यांनी उत्तीर्ण करावयाची परीक्षा.**—या नियमावलीच्या अधीनतेने इंग्रजी लघुलेखनाचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे काम करणाऱ्या प्रत्येक लघुलेखकाला किंवा प्रत्येक टंकलेखकाला नियम ४ मध्ये विहित केलेल्या कालावधीत खालीलप्रमाणे परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल :—

| अनुक्रमांक<br>(१) | पदनाम<br>(२) | उत्तीर्ण करावयाची परीक्षा<br>(३) |
|---|---|---|
| १ | इंग्रजी लघुलेखनाचे काम करणारे निवडश्रेणी, उच्चश्रेणी व निम्न-श्रेणी लघुलेखक. | एतदर्थ मंडळाची प्रति मिनिट ८० शब्द गतीची मराठी लघुलेखनाची व प्रति मिनिट ३० शब्द गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा. |
| २ | इंग्रजी लघुलेखनाचे आणि इंग्रजी टंकलेखनाचे काम करणारा लघु-टंकलेखक. | एतदर्थ मंडळाची प्रति मिनिट ८० शब्द गतीची मराठी लघुलेखनाची व एतदर्थ मंडळाची प्रति मिनिट ३० शब्द गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा. |
| ३ | इंग्रजी टंकलेखनाचे काम करणारे टंकलेखक व लिपिक टंकलेखक. | एतदर्थ मंडळाची प्रति मिनिट ३० शब्द गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा. |

४. **परीक्षा उत्तीर्ण होण्याची मुदत.**—(१) प्रथम भाषा म्हणून मराठी (उच्चस्तर) विषय घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेले जे इंग्रजी लघुलेखक किंवा इंग्रजी टंकलेखक.—

(अ) जे प्रारंभ दिनांकी शासनाच्या सेवेत असतील त्यांना नियम ३ मध्ये विहित केलेली परीक्षा प्रारंभ दिनांकापासून ४ वर्षाच्या आत उत्तीर्ण व्हावी लागेल.

(ब) जे प्रारंभ दिनांकानंतर शासन सेवेत असतील त्यांना नियम ३ मध्ये विहित केलेली परीक्षा शासन सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या आत उत्तीर्ण व्हावी लागेल.

(२) प्रथम भाषा म्हणून मराठी (उच्चस्तर) विषय न घेता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेले जे इंग्रजी लघुलेखक किंवा इंग्रजी टंकलेखक.—

(अ) प्रारंभ दिनांकी शासनाच्या सेवेत असतील त्यांना नियम ३ मध्ये विहित केलेल्या परीक्षा प्रारंभ दिनांकापासून ६ वर्षाच्या आत उत्तीर्ण व्हावी लागेल.

(ब) प्रारंभ दिनांकानंतर शासन सेवेत प्रवेश करतील त्यांना नियम ३ मध्ये विहित केलेली परीक्षा सेवेत केल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्याआत उत्तीर्ण व्हावी लागेल

५. **प्रशिक्षण.**—(१) इंग्रजी लघुलेखकांसाठी मराठी लघुलेखन प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्षाचा असेल या एक वर्षाच्या कालावधीतच त्याला मराठी टंकलेखनाचे प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल.

(२) इंग्रजी टंकलेखकासाठी मराठी टंकलेखन प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा राहील.

(३) इंग्रजी लघुलेखकाला/टंकलेखकाला वरील पोट-नियम (१) व (२) मध्ये उल्लेखिलेले प्रशिक्षण कोणत्याही स्थानिक वाणिज्य संस्थेत घेता येईल. ज्या ठिकाणी अशी कोणतीही स्थानिक वाणिज्य संस्था नसेल त्या ठिकाणी त्याला/तिला खाजगीरीत्या उक्त प्रशिक्षण घेता येईल. अशा खाजगी प्रशिक्षणासाठी इंग्रजी लघुलेखकाला/टंकलेखकाला तो/ती परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर शासन वेळोवेळी जाहीर करील अशी रक्कम देण्यात येईल.

(४) उपरोक्त पोट नियमामध्ये उल्लेख केलेले प्रशिक्षण घेऊ च्छिणाऱ्या इंग्रजी लघुलेखकाला किंवा इंग्रजी टंकलेखकाला आपल्या कार्यालय प्रमुखाकडे सोबतच्या परिशिष्टामध्ये विहित केलेल्या नमुना १ किंवा नमुना २ मध्ये अर्ज करावा लागेल. कार्यालय प्रमुख आपल्या मंजूर अनुदानातून प्रशिक्षणाचा खर्च करतील.

(५) प्रशिक्षण घेणाऱ्या इंग्रजी लघुलेखकाला/इंग्रजी टंकलेखकाला प्रशिक्षण मध्येच सोडून देता येणार नाही. तथापि त्याने विधिग्राह्य कारणास्तव प्रशिक्षण अपूर्ण सोडल्यास उर्वरीत प्रशिक्षण त्याला/तिला स्वखर्चाने पूर्ण करावे लागेल. अन्यथा त्याला/तिला त्याच्या/तिच्या प्रशिक्षणावर खर्च करण्यात आलेली रक्कम शासनाला परत करावी लागेल आणि/किंवा तो/ती कार्यालय प्रमुखास योग्य वाटेल अशा अनुशासनिक कार्यवाहीस पात्र होईल.

(६) शासकीय खर्चाने प्रशिक्षण घेतलेल्या इंग्रजी लघुलेखकाला/इंग्रजी टंकलेखकाला उपरोक्त पोट नियमांमध्ये उल्लेख केलेल्या प्रशिक्षणाचा लाभ पुन्हा घेण्याचा हक्क असणार नाही.

(७) संबंधित इंग्रजी लघुलेखकाच्या/टंकलेखकाच्या कार्यालय प्रमुखांना इंग्रजी लघुलेखकाची/इंग्रजी टंकलेखकाची माहिती परिशिष्टामध्ये विहित केलेल्या नमुना ३ किंवा ४ मध्ये भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे प्रशिक्षण सुरू झाल्यापासून १ महिन्याच्या आत पाठवावी लागेल.

६. परीक्षा.—(१) या नियमावलीच्या उपबंधाच्या अधीनतेने, एतदर्थ मंडळ दर कॅलेंडर वर्षी एप्रिल व ऑक्टोबर या महिन्यात, मराठी लघुलेखनाच्या व मराठी टंकलेखनाच्या परीक्षा सोयीस्कर केंद्रावर आयोजित करील.

(२) प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर इंग्रजी लघुलेखक/इंग्रजी टंकलेखक यांना आपल्या कार्यालय प्रमुखामार्फत परिशिष्टामध्ये विहित केलेल्या नमुना ५ किंवा नमुना ६ मध्ये एप्रिलच्या परीक्षेसाठी १५ फेब्रुवारी रोजी किंवा तत्पूर्वी व ऑक्टोबरच्या परीक्षेसाठी १५ जुलै रोजी किंवा तत्पूर्वी भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे परीक्षेला बसण्याच्या परवानगी साठी अर्ज पाठवावे लागतील.

(३) परीक्षेसाठी लागणाऱ्या मराठी टंकलेखन यंत्राची व्यवस्था त्याला/तिला स्वखर्चाने करावी लागेल.

७. **परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम.**---(१) जो इंग्रजी लघुलेखक/इंग्रजी टंकलेखक उपरोक्त नियम ४ मध्ये विहित केलेल्या मुदतीत उपरोक्त परीक्षा उत्तीर्ण होणार नाही, तो/ती परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा त्यास/तिला अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळेपर्यंत त्याची/तिची वार्षिक वेतनवाढ रोखून धरली जाण्यास पात्र होईल.

(२) परीक्षा ज्या तारखेस संपली असेल त्या तारखेच्या लगतनंतरची तारीख ही परीक्षा उत्तीर्ण झाल्याची तारीख असल्याचे समजण्यात येईल.

(३) अशा प्रकारे रोखून धरलेल्या वेतनवाढी, शासकीय कर्मचारी ज्या तारखेला परीक्षा उत्तीर्ण होईल किंवा त्याला/तिला अशा प्रकारे परीक्षा उत्तीर्ण होण्यासापासून सूट देण्यात येईल त्या तारखेला देय होतील आणि जणूकाही त्यांच्या वेतनवाढी रोखल्या नव्हत्या असे समजून त्या उपार्जित होतील परंतु वेतनवाढी रोखून धरल्यामुळे थकबाकी मिळण्याचा त्याला/तिला हक्क असणार नाही.

८. **परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट.**---इंग्रजी लघुलेखक/टंकलेखक प्रारंभ दिनांकास ५० वर्षे वयाचा झालेला असेल तर, अगर त्यानंतर ज्या दिनांकास तो ५० वर्षे वयाचा होईल तेव्हा त्याला/तिला ती परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळेल.

९. **ही नियमावली लागू होण्याबाबत.**---प्रारंभ दिनांकापूर्वी ज्या इंग्रजी लघुलेखकांनी/टंकलेखकांनी विद्यमान प्रशिक्षण योजनेनुसार मराठी लघुलेखनाचे किंवा मराठी टंकलेखनाचे प्रशिक्षण घेण्याचे सुरुवात केले असेल त्यांना सुद्धा ही नियमावली लागू राहील.

१०. या नियमावलीतील काहीही अंतर्भूत असले तरी शासनाला विशेष परिस्थितीमध्ये यापैकी कोणत्याही नियमाच्या तरतुदी त्याला न्याय व संयुक्तिक वाटेल, अशा रीतीने शिथिल करता येतील. मात्र अशा कोणत्याही शिथिलीकरणाची कारणे नमूद करावी लागतील.

## परिशिष्ट

### नमुना एक

[नियम ५ (४) पहा]

### मराठी लघुलेखन प्रशिक्षणासाठी अर्जाचा नमुना

प्रति

कार्यालय प्रमुख

महोदय,

शासकीय अधिसूचना क्र. टंलेप्र-१०८१/सीआर-३४४/वीस-ब, दिनांक ६ मे १९९१ अन्वय विहित केलेल्या नियमांच्या अधीनतेने मी, दिनांक ............. पासून सुरू होणाऱ्या मराठी लघुलेखनाच्या प्रशिक्षणास दाखल होऊ इच्छितो/इच्छिते. सदर प्रशिक्षण मी ..... .......................... या वाणिज्य संस्थेत घेऊ इच्छितो/इच्छिते. तरी सदर प्रशिक्षणासाठी माझी कृपया निवड करावी, ही विनंती.

आपला/आपली

सही

पदनाम.

परिशिष्ट

नमुना दोन

[नियम ५ (४) पहा]

मराठी टंकलेखन प्रशिक्षणासाठी अर्जाचा नमुना

प्रति

कार्यालय प्रमुख

महोदय,

शासकीय अधिसूचना क्र. टंलेप्र-१०८१/सीआर-३४४/भास-ब, दिनांक ६ मे १९९१ अन्वये विहित केलेल्या नियमांच्या अधीनतेने मी, दिनांक ··············पासून सुरू होणाऱ्या मराठी टंकलेखनाच्या प्रशिक्षणास दाखल होऊ इच्छितो/इच्छिते. सदर प्रशिक्षण मी ······························या वाणिज्य संस्थेत घेऊ इच्छितो/इच्छिते. तरी सदर प्रशिक्षणासाठी माझी कृपया निवड करावी, ही विनंती.

आपला/आपली

सही

पदनाम

परिशिष्ट

नमुना तीन

[नियम ५ (७) पहा]

कार्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता ........................

........................

प्रशिक्षणाचा कालावधी ..........

प्रशिक्षणासाठी निवड केलेल्या लघुलेखकांची यादी

| अनु-क्रमांक | कर्मचाऱ्याचे पूर्ण नाव | धारण केलेले पद व मूळ नियुक्ती दिनांक | प्रशिक्षणासाठी जेथे दाखल केले, त्या वाणिज्य संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रशिक्षणासाठी दाखल केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

दिनांक

सही

पदनाम

प्रत--

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य,
नवीन प्रशासन भवन, १४ वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

परिशिष्ट

नमुना चार

[नियम ५ (७) पहा]

कार्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता ........................

........................

प्रशिक्षणाचा कालावधी ..........

प्रशिक्षणासाठी निवड केलेल्या टंकलेखकांची यादी

| अनु-क्रमांक | कर्मचाऱ्याचे पूर्ण नाव | धारण केलेले पद व मूळ नियुक्ती दिनांक | प्रशिक्षणासाठी जेथे दाखल केले, त्या वाणिज्य संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रशिक्षणासाठी दाखल केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

दिनांक

सही

पदनाम

प्रत—

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य,
नवीन प्रशासन भवन, १४ वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

परिशिष्ट

नमुना पाच

[ नियम ६ (२) पहा ]

## एतदर्थ मंडळाच्या मराठी लघुलेखन परीक्षेकरिता अर्जाचा नमुना

अध्यक्ष,

एतदर्थ मंडळ,
मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षा,
द्वारा—विभागीय सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, मुंबई (कोकण)/
पुणे व नाशिक/नागपूर व अमरावती/औरंगाबाद विभाग,
यांस,

महोदय,

आहे *.................. मध्ये होणाऱ्या एतदर्थ मंडळ मराठी लघुलेखनाच्या प्रति मिनिट ८० शब्दांच्या परीक्षेत बसण्याची माझी इच्छा आहे. *सदर परीक्षेस मी प्रथमच बसत आहे/यापूर्वी बसलो/बसले असून आवश्यक तपशील खाली दिला आहे :—

१. संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) .. ..

२. *पदनाम (इंग्रजी लघुलेखक निवडश्रेणी/उच्च/निम्नश्रेणी इंग्रजी लघुटंकलेखक)

३. (अ) कार्यालय प्रमुखाचे पदनाम ..

(ब) कार्यालयाचा पूर्ण पत्ता .. ..

४. उमेदवार पूर्वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाला असेल अगर अनुपस्थित असेल तर .. ..

(अ) त्या परीक्षेचा महिना व वर्ष ..

(ब) आसन क्रमांक .. ..

(क) परीक्षा केंद्र .. ..

५. निवडलेल्या केंद्राचे नाव .. ..

अर्जात मी नमूद केलेली सर्व माहिती खरी आहे. तरी मला माहे .............. मध्ये होणाऱ्या परीक्षेस बसण्याची परवानगी मिळावी अशी विनंती आहे.

आपला/आपली,

दिनांक : (अर्जदाराची सही)

स्थळ :

प्रमाणपत्र

*प्रमाणित करण्यात येते की, श्री./कु./श्रीमती ..............................
यांनी वरील अर्जात दिलेली माहिती बरोबर असून ते/त्या परीक्षेला बसण्यास पात्र आहेत.

कार्यालयाचे-प्रमुखाचे नाव, पदनाम
सही व शिक्का.

---

( *लागू नसलेला मजकूर खोडावा)

परिशिष्ट

नमुना सहा

[ नियम ६ (२) पहा ]

एतदर्थ मंडळाच्या मराठी टंकलेखन परीक्षेकरिता अर्जाचा नमुना

अध्यक्ष,
एतदर्थ मंडळ,
मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षा,
द्वारा—विभागीय सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, मुंबई (कोकण)/
पुणे व नाशिक/नागपूर व अमरावती/औरंगाबाद विभाग,
यांस,

महोदय,

माहे .................... मध्ये होणाऱ्या एतदर्थ मंडळाच्या मराठी टंकलेखन परीक्षेस बसण्याची माझी इच्छा आहे. *सदर परीक्षेस मी प्रथमच बसत आहे/यापूर्वी बसलो/बसले असून आवश्यक तपशील खाली दिला आहे :—

१. संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) .. ..

२. *पदनाम (इंग्रजी टंकलेखन इंग्रजी टंकलेखनाचे काम करणारे लिपिक) ..

३. (अ) कार्यालय-प्रमुखाचे पदनाम ..

(ब) कार्यालयाचा पूर्ण पत्ता .. ..

४. उमेदवार पूर्वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाला असेल अगर अनुपस्थित राहीला असेल तर— ..

(अ) त्या परीक्षेचा महिना व वर्ष ..

(ब) आसन क्रमांक .. ..

(क) परीक्षा केंद्र .. ..

५. एखाद्या प्रश्नपत्रिकेत सूट मिळाली आहे काय ?

असेल तर,

[अ] प्रश्नपत्रिकेचा विभाग क्रमांक

[ब] परीक्षेचा महिना व वर्ष

[क] आसन क्रमांक

६. निवडलेल्या केंद्राचे नाव .. ..

मी अर्जात नमूद केलेली सर्व माहिती खरी आहे. तरी मला माहे ............ मध्ये होणाऱ्या परीक्षेस बसण्याची परवानगी मिळावी ही विनंती

आपला/आपली,

(अर्जदाराची सही)

दिनांक :

स्थळ :

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री./कु./श्रीमती ........................ यांनी वरील अर्जात दिलेली माहिती बरोबर असून ते/त्या परीक्षेला बसण्यास पात्र आहेत.

कार्यालय-प्रमुखाचे नाव, पदनाम
सही व शिक्का.

---

( *लागू नसलेला मजकूर खोडावा )

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. व. आम्बेरकर,
शासनाचे उप सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

इंग्रजी लघुलेखक [ निवड श्रेणी, उच्च श्रेणी व निम्न श्रेणी ] व इंग्रजी टंकलेखक यांना मराठी लघुलेखन/ मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक-टंलप्र-१०८ /सीआर-३४४/२०-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ६ मे, १९९१.

## नि र्ण य

शासकीय कर्मचा-यांकरिता मराठी टंकलेखन व लघुलेखन प्रशिक्षण योजना शासनाने कार्यान्वित केली होती व एतदर्थ मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणा-या कर्मचा-यांना प्रोत्साहनात्मक बक्षीस देण्यात येत होते. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की अशी प्रोत्साहनात्मक बक्षीसे देवून देखील इंग्रजी लघुलेखक व टंकलेखक यांचेकडून पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. यास्तव या बाबतीतील सध्याचे सर्व आदेशांचे अधिक्रमण करून शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील इंग्रजी लघुलेखक [ निवड श्रेणी, उच्च श्रेणी व निम्न श्रेणी ] व इंग्रजी टंकलेखक यांनी प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन अर्हताबाबतची नियमावली भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३०९ च्या परंतुकान्वये अधिसूचनेच्या स्वरूपात राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी. त्यानुसार सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे व प्रसिध्द केल्यानंतर आवश्यक त्या प्रती सर्व संबंधितांना शासन मुद्रणालय व लेखनसामग्री यांचेकडून निर्गमित करण्यात याव्यात.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
13 SEP 1991

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. व. आम्बेरकर,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] राज्यपाल यांचे सचिव,
२] मुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
३] सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
४] प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई [पत्राने],
५] प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई [पत्राने],
६] सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई [पत्राने],
७] लोकायुक्त / उपलोकायुक्त, मुंबई [पत्राने],
८] सर्व विभागीय आयुक्त,

शा. म. मु. रोटा/सा. प्र. वि. /एच-४९०[ ३०००-८-९१ ]-१

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक ५५(२)] बुधवार, जून ७, २०१७/ज्येष्ठ १७, शके १९३९ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक ९१

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जून २०१७.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. २०१४/प्र.क्र.३५५/१२.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेले सर्व नियम, आदेश आणि अनुदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील " लिपिक-टंकलेखक ", गट-क या पदावरील सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहेत :—

**१.** (१) या नियमांना बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील " लिपिक-टंकलेखक ", गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१७, असे संबोधण्यात यावे.

(२) हे नियम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेत नसलेल्या, बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील " लिपिक-टंकलेखक", गट-क पदांना लागू राहतील :

परंतु प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील " लिपिक-टंकलेखक ", गट-क पदासाठी स्वतंत्र सेवाप्रवेश नियम तयार केले असतील त्या कार्यालयातील पदांना प्रस्तुत नियम लागू होणार नाहीत.

**२.** या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) " प्रशासकीय विभाग " याचा अर्थ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-१६६ अन्वये बनविलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला विभाग व त्यामध्ये त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये असा आहे ;

(ख) " पदवी " याचा अर्थ सांविधिक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता ;

(ग) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे ;

(घ) " शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र " याचा अर्थ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या शासकीय परीक्षा मंडळाचे टंकलेखनाचे किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र असून, यात शासनाने या प्रयोजनार्थ मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही संस्थेने दिलेल्या प्रमाणपत्राचा समावेश होतो ;

(च) " गट-ड " याचा अर्थ, गट-ड मध्ये येणारी पदे असा आहे ;

(छ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१) अन्वये गठीत केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो.

**३.** बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक, गट-क या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :–

(क) गट-ड मधील पद धारण करणाऱ्या व गट-ड मधील पदावर किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ;

**किंवा**

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे,—

(एक) खुल्या वर्गातील व्यक्तींसाठी एकोणीस वर्षांपेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षांपेक्षा जास्त वय नसलेल्या आणि मागासवर्गीय व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षांपेक्षा जास्त वय नसलेल्या ;

(दोन) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे ;आणि

(तीन) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४०शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे ;

**किंवा**

(ग) अनुकंपातत्वावर निवड करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवाराची अनुकंपातत्वावर नियुक्तीने ;

**किंवा**

(घ) गट-क मधील वाहनचालक या पदावर किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व लिपिक-टंकलेखक पदावर येण्यास इच्छुकता दिलेल्या व्यक्तींमधून, ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या कायमस्वरुपी संवर्ग बदलीने नियुक्ती देता येईल. वाहनचालक या पदावरून नियुक्ती दिलेल्या व्यक्तींची लिपिक-टंकलेखक पदावरील सेवाज्येष्ठता लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून निश्चित करण्यात येईल ;

**किंवा**

(च) शासकीय कार्यालयातील समतुल्य पद धारण करणाऱ्या आणि खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन)मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईल.

परंतु, माजी सैनिकांमधून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी खंड (ख) च्या उप खंड (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास, सदर अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्यांच्या कालमर्यादेत प्राप्त करील या अटीवर सदर पदासाठीच्या स्पर्धा परीक्षेकरिता अर्ज करण्यास परवानगी दिली जाईल.

परंतु, असे की, सदर पदावर माजी सैनिकातून नियुक्त झालेल्या व्यक्तीने खंड (ख) च्या उप खंड (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता, त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्यांच्या कालमर्यादेत धारण न केल्यास, सदर व्यक्तीची सेवा समाप्त करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, सदर पदावर अनुकंपा तत्त्वावर नियुक्त होणारी व्यक्ती खंड (ख) च्या उप खंड (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करीत नसेल तर, अशा व्यक्तीने सदर अर्हता शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या कालमर्यादेत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा याबाबतीत शासनाच्या प्रचलित आदेशानुसार कारवाई करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, सदर सेवाप्रवेश नियम **शासन राजपत्रात** प्रसिद्ध होणाऱ्या दिनांकापूर्वी अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षा यादीत अंतर्भूत केलेल्या उमेदवारांना माध्यमिक शांलात परीक्षा प्रमाणपत्र हीच शैक्षणिक अर्हता लागू राहील. तथापि, हे सेवाप्रवेश नियम **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अनुकंपा तत्त्वाद्वारे नियुक्तीसाठी प्रतिक्षा यादीत नाव नोंदविण्याकरिता खंड ( ख ) च्या उपखंड (दोन) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता आवश्यक राहील.

परंतु आणखी असे की, खंड ( ख) च्या उप खंड (एक) मध्ये विहित केलेली उच्चतम वयोमर्यादा ही अनुकंपा किंवा पदवीधर अंशकालीन यासारख्या पसंतीक्रमांतर्गत आणि माजी सैनिक, अपंग, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व खेळाडू या सारख्या समांतर आरक्षणांतर्गत वर्गातून नियुक्त करावयाच्या उमेदवारांना लागू राहणार नाही. यासारख्या वर्गातील उमेदवारांना शासनाने वेळोवेळी घोषित केलेले उच्चतम वयोमर्यादेसंदर्भातील प्रचलित धोरण लागू राहील.

**४.** नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने व वाहनचालकामधून कायमस्वरुपी बदलीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ४०:५०:१० असे राहील.

परंतु असे की, पदोन्नतीने किंवा वाहनचालकामधून कायमस्वरुपी बदलीने नियुक्तीसाठी विहित अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, नियुक्ती प्राधिकाऱ्यांना पदोन्नतीचे व वाहनचालकामधून कायमस्वरुपी बदलीचे प्रमाण शिथील करून उमेदवारांची नामनिर्देशनाने नियुक्ती करता येईल.

**५.** नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा, आवश्यक असल्यास, उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**६.** नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

**७.** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**८.** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार जिल्हा, मंडळ, विभाग किंवा अन्य स्तरावर बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मुकेश खुल्लर,**

शासनाचे अपर मुख्य सचिव.